# पुणे विद्यापीठ

परीक्षा विभाग

दूरध्वनी क्र.०२०–२५६०१२०४
इंजि.– २५६०१२१९
मॅनेज/लॉ/शि.शा. .–२५६०१२१६
आर्टस.– २५६०१२१३
सायन्स.– २५६०१२१४/कॉमर्स–२५६०१२१५
फार्मसी/मेडिकल–२५६०१२२०

टेलिग्राफ : "युनिपुणे"
फॅक्स –०२०–२५६०१२०८
फॅक्स –०२०–२५६०१२०४

वेबसाईटःwww.unipune.ac.in
ई.मेल coe@unipune.ernet.in

---

संदर्भः परीक्षा/बी.एस्सी.[बायोटेक्नॉलॉजी]/२३१ — दि. ३.१२.२०११ (५)

मा. प्राचार्य,
सर्व संलग्न बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी महाविद्यालये.

विषय : एस.वाय./टी.वाय. बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी ऑक्टोबर, २०११ परीक्षेच्या निकालाबाबत...

महोदय/महोदया,

एस.वाय./टी.वाय. बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी ऑक्टोबर २०११ मध्ये घेतलेल्या परीक्षेचा निकाल बुधवार दि ७.१२.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता जाहीर करण्यात येत आहे. परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे महाविद्यालयात वितरीत करण्यात येईल.

१. पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल बुधवार दि ७.१२.२०११ रोजी १२.०० ते ३.०० या वेळेत परीक्षा विभागातून घेऊन जावयाचा आहे.

२. अहमदनगर व नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून बुधवार दि ७.१२.२०११ रोजी दुपारी १२.०० ते ३.०० या वेळेत घेऊन जावयाचा आहे.

आपल्या महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी.. त्यामुळे विद्यापीठामध्ये निकाल विचारण्यासाठी अथवा इतर चौकशी करण्यासाठी विद्यार्थ्यांना यावे लागणार नाही. त्याचप्रमाणे एखाद्या विद्यार्थ्याच्या गुणपत्रकामध्ये काही दोष अथवा त्रुटी आढळल्यास, विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठात न पाठविता, महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत. त्यानंतर त्यातील दुरुस्त्या त्वरीत करुन घेण्याबाबत कार्यवाही करता येईल.

आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत घेऊन जाण्याची व वितरण करण्याची व्यवस्था करावी. **एस.वाय.टी.वाय.बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी परीक्षेंच्या निकालाची कॉलेज कॉपी सी.डी. मध्ये पाठवित आहे. कृपया याची नोंद घ्यावी.**

सोबत : वरीलप्रमाणे सी.डी.

आपला विश्वासू,

05/12/2011

उपकुलसचिव
[परीक्षा]

प्रत माहितीसाठी :
१. विद्यापीठ उपकेंद्र प्रमुख, नाशिक/अहमदनगर, यांनी सदर निकाल संबंधित महाविद्यालयांना वेळेवर देण्याची व्यवस्था करावी.

A१/b.sc.mrathi/३८